पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८, कामगार कल्याण विभाग
क्रमांक – काक/३/कावि/ ३१२ /२०१७
दिनांक - २६ सप्टेंबर २०१७

**विषय** - कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दर व भविष्य निर्वाह निधी वर्गणीबाबत.

**संदर्भ** - १. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्रमांक एमसीओ २०१४/प्र.क्र.१५३/नवि १४ दिनांक ०१ सप्टेंबर २०१४.
२. महाराष्ट्र शासनाच्या उदयोग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील दिनांक २७ जानेवारी २०१७ ची अधिसूचना.

**आदेश**,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांना तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटदारामार्फत नेमण्यात आलेल्या कंत्राटी सफाई कामगारांना उपरोक्त संदर्भिय नुसार किमान वेतन दर लागू करणे तसेच सदर कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील संदर्भिय क्र. १ चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांचे सुधारित वर्गीकरण करणेत आलेले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका "क" वर्गामधून "ब" वर्गामध्ये वर्गीकृत करणेत आली आहे. त्यामुळे विविध विभागामार्फत नियमाधिन मुदतीसाठी एकत्रीत मानधन तत्वावर नियुक्त कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या संदर्भिय क्र. १ चे शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे दरमहा किमान वेतन आदा करण्यात यावे.

**कामाचे स्वरुप – हॉस्पीटल**

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | ६,२००.०० | ३,५२७.५५ | ९,७२७.५५ |
| २ | अर्धकुशल कामगार | ५,७००.०० | ३,५२७.५५ | ९,२२७.५५ |
| ३ | अकुशल | ५,३००.०० | ३,५२७.५५ | ८,८२७.५५ |

**कामाचे स्वरुप – हॉस्पीटल व्यतिरिक्त इतर कामकाज**

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | ५,८००.०० | ३,२५६.२० | ९,०५६.२० |
| २ | अर्धकुशल कामगार | ५,४००.०० | ३,२५६.२० | ८,६५६.२० |
| ३ | अकुशल | ५,०००.०० | ३,२५६.२० | ८,२५६.२० |

ब. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयासाठी तसेच इतर विभागासाठी कंत्राटी पध्दतीने देण्यात येणा-या कंत्राटदाराकडील सफाई कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या संदर्भिय क्र. २ चे अधिसूचनेनुसार खालीलप्रमाणे किमान वेतन आदा करण्यात यावे.

| अ. क्र. | प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | सफाई कामगार | १०,०००.०० | ९८६.०० | १०,९८६.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील.

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा | कामगाराचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% | -- |
| २ | ई.पी.एफ. (१ + २ यावर) | १३.१६% | १२% |
| ३ | ई.एस.आय. (१ + २ + घरभाडे ५% यावर) | ४.७५% | १.७५% |
| ४ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% | -- |
| ५ | रजा वेतन (१ + २) यावर | ४% | -- |
| ६ | सार्वजनिक सुट्टयांचे वेतन (१ + २) यावर | १% | |
| ७ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | रु. ६/- | रु. २/- |
| ८ | सेवा शुल्क | १०% | -- |

१. ज्या कंत्राटी कामगाराचे किमान वेतन (मुळ वेतन + विशेष भत्ता) रक्कम रुपये १५,०००/- पेक्षा कमी आहे अशा कंत्राटी कामगारांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची वर्गणी कामगारांचा हिस्सा १२ टक्के तसेच मालकाचा हिस्सा १३.१६ टक्के याप्रमाणे एकुण २५.१६ टक्के रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणेत यावी.

२. ज्या कंत्राटी कामगारांना गणवेश देण्यात येतो त्या कामगारांना दरमहा धुलाई भत्ता र. रु. १००/- देय राहील.

३. महानगरपालिकेसाठी सेवा पुरविणा-या सर्व कंत्राटदारांना भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर घेणे आवश्यक असेल.

४. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून नेमलेल्या कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा भविष्य निर्वाह निधी कोड क्रमांक MH 305159 वर जमा करण्याची दक्षता सर्व संबधीत विभागांनी घ्यावी.

५. ज्या कंत्राटदार संस्थांना अपवादात्मक कारणामुळे त्यांनी नेमलेल्या कामगारांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी त्यांच्या कोडनंबर भरणे शक्य होणार नाही अशा कंत्राटदार संस्थांच्या कामगारांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वरील भविष्य निर्वाह निधी कोड नंबरवर भरण्यात यावी.

६. संबंधीत विभागाकडून कपात करण्यात येणारा कंत्राटी कामगारांचा भविष्य निर्वाह निधीचा हिस्सा १२ टक्के जमा करुन घेण्यासाठी व त्याबरोबर मालकाचा हिस्सा रक्कम रुपये १३.१६ टक्के रक्कम आदा करणेबाबत आवश्यक त्या रक्कमेसह अंदाजपत्रकीय लेखाशिर्षक उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था मुख्य लेखा विभागाने तात्काळ करावी. सदर लेखाशिर्षावर जमा झालेली रक्कम मनपा कोड क्रमांकावर भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे दरमहा १५ तारखेचे आत जमा करावी.

७. कंत्राटदार संस्थांनी कामगारांचे मासिक हजेरीपत्रक, कंत्राटी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी त्या त्या महिन्यात भरल्याबाबत मासिक हजेरीपत्रक, कामगारांच्या रिव्हेन्यू स्टॅम्प लावून त्यावर संबंधीत कामगारांची स्वाक्षरी असलेले वेतन रजिस्टर, कामगारांच्या यादीसह ई.सी.आर., ई.एस.आय. चलन, कामगार कल्याण निधी तसेच सर्व शासकीय लेव्हीची पुर्तता केलेबाबत तसेच संबंधीत कामगारांचे मागील

महिन्याचे वेतन बँकेमार्फत Account payee Cross Cheque (रेखांकित धनादेश) द्वारेच अदा केल्याचा पुरावा दरमहा सादर केल्यानंतरच सदर कंत्राटदाराचे त्या महिन्याचे देयक अदा करण्याची दक्षता संबंधीत विभागांनी घ्यावी.

८. विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने थेट कामगार नेमलेले असल्यास सदर कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, ई.एस.आय., कामगार कल्याण निधी इ. शासकीय लेव्ही संबंधीत कार्यालयाकडे जमा करणेबाबतची कार्यवाही संबंधीत विभागामार्फत करण्यात यावी.

९. कंत्राटी कामगारांना नियमानुसार साप्ताहिक सुट्टी तसेच मासिक वेतन चिठ्ठी देण्यात यावी.

१०. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांना कंत्राटदार किमान वेतन दराने वेतन आदा करीत असल्याबाबत संबधीत विभागांनी वेळोवेळी तपासणी करुन खात्री करावी.

११. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांस किमान वेतन दराने अदायगी केली नाही अशी तक्रार सिध्द झाल्यास संबधीत कंत्राटदाराचा ठेका त्वरित रद्द करण्यात यावा.

१२. कंत्राटी कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने पुरविण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील. तथापि महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाच्या पर्यवेक्षीय अधिका-याने कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना आवश्यक ती सर्व सुरक्षा साधने पुरवली आहेत किंवा कसे तसेच पुरवलेली सुरक्षा साधने कंत्राटी कामगार वापरतात किंवा कसे याबाबत तपासणी करावी.

१३. दर सहा महिन्यांची प्रसिध्द होणा-या विशेष भत्त्याबाबत कामगार कल्याण विभागाने परिपत्रक निर्गत करुन महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी किमान वेतन दराची अदायगी करण्यात यावी.

१४. दिनांक ०१.०७.२०१७ पासून लागू झालेल्या गुडस सर्व्हीस टॅक्स (Goods Service Tax) बाबत लेखा विभागाकडून माहिती घेऊन संबधीत विभागांनी पुर्तता करावी.

१५. संबंधीत विभागांनी निविदा नोटिस प्रसिध्द करण्यापुर्वी किमान वेतन दराबाबत कामगार कल्याण विभागाचा अभिप्राय घेणे बंधनकारक राहील.

१६. भविष्य निर्वाह निधीची पुर्तता करणेबाबत सर्व प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी लेखा विभागाने स्वतंत्र कन्सलटंटची नेमणुक करावी.

१७. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी दिनांक ०१.०७.२०१७ पासून करण्यात यावी.

१८. कंत्राटी सेवा पुरविणा-या ठेकेदाराने वर नमूद केलेल्या दरानुसार कामगारांना वेतन अदा केल्याबाबतचे महिनानिहाय पुरावे आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सादर केलेनंतर व सादर केलेल्या पुराव्याबाबत विभागप्रमुखांची खातरजमा झालेनंतरच ठेकेदारास फरकाची रक्कम अदा करणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८